# जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, कोल्हापूर

**स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजना अंतर्गत**
**कौशल्यवृध्दी प्रशिक्षण कार्यक्रम (गारमेंट ) विशेष प्रकल्प**

कोल्हापूर जिल्हयातील ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील कुटूंबातील बेरोजगार युवक-युवतींना स्वरोजगारातून उदरनिर्वाहाचे साधन उपलब्ध करुन देणेच्या दृष्टीने जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, कोल्हापूर यांनी एक योजना प्रस्तावित केलेली आहे. रोजगाराची संधी मोठया प्रमाणात उपलब्ध असणाऱ्या गारमेंट क्षेत्रात उद्योग विषयक प्रशिक्षण देण्यासाठी प्रकल्प तयार करणेत आलेला आहे. इचलकरंजी परिसरात गारमेंट उद्योगाने समृध्द असणाऱ्या अशासकीय संस्था मारुती फौंडेशन, इचलकरंजी यांच्या नियंत्रणाखाली कौशल्यवृध्दी प्रशिक्षण कार्यक्रमाचा विशेष प्रकल्प तयार करण्यात आला. सदरचा प्रकल्प प्रस्ताव जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, कोल्हापूर कडील पत्र क्र. कोजिग्रावियं/वशि/विप्रअ/२००८ दिनांक २५/८/२००८ अन्वये कौशल्यवृध्दी प्रशिक्षण कार्यक्रमाचा विशेष प्रकल्प प्रस्ताव राज्य शासनाकडील ग्राम विकास व जलसंधारण विभागा मार्फत केंद्र शासनास सादर करणेत आलेला होता.

सदर प्रकल्पाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी आवश्यक असणाऱ्या सुधारणासह राज्य शासन व केंद्र शासनाच्या स्तरावर प्रकल्प अंमलबजावणी बाबतच्या अनुषंगाने आवश्यक असणारे सादरीकरण करणेत आलेले होते.

**<u>या प्रकल्पाचे साधारण स्वरुप खालील प्रमाणे आहे.</u>**

| | | |
|---|---|---|
| प्रकल्पाचे नांव | - | कौशल्यवृध्दी प्रशिक्षण (गारमेंट ) कार्यक्रम |
| प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेचे नांव | - | मारुती फौंडेशन, इचलकरंजी, ता. हातकणंगले. |
| कार्यक्षेत्र | | - `करवीर, हातकणंगले, शिरोळ, कागल व गडहिंग्लज. |
| **प्रकल्पाचे मुल्य** | **-** | **रु. ६५५.५५ लाख** |
| केंद्र शासनाचा निधी | - | रु. ३८७.४९ लाख |
| राज्य शासनाचा निधी | - | रु. १२९.१७ लाख |
| संस्थेचे हिस्सा | - | रु. १३८.९० लाख |
| वार्षिक प्रशिक्षणार्थीचे उदिष्ट | - | प्रथम वर्ष १००० लाभार्थी |
| | | द्वितीय वर्ष २००० लाभार्थी |
| | | तृतीय वर्ष २००० लाभार्थी |

वरील प्रमाणे सादर करणेत आलेल्या या कौशल्यवृध्दी प्रशिक्षण कार्यक्रम विशेष प्रकल्पास केंद्र शासनाकडील पत्र क्र. J-१७०२५/१८/२००८-SGSY-II (SP), Govt. of India, Ministry of Rural Development, Krishi Bhavan, New Delhi. Dated १३$^{th}$ Jan., २०१० अन्वये मंजूरी प्राप्त झालेली आहे. सदरच्या आदेशानुसार मंजूर प्रकल्पाचा केंद्र व राज्य शासनाचा निधी २५:५०:२५ अशा तीन हप्त्यामध्ये आदा करणेचा आहे. तसेच या आदेशान्वये या प्रकल्पासाठी पहिल्या हप्त्याचा निधी म्हणून रक्कम रु. ९६.८७ लाख इतका केंद्र शासनाचा व रक्कम रु. ४६.१३ राज्य शासनाकडून असा एकूण रक्कम रु. १४३.०० लाख इतका निधी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, कोल्हापूर कार्यालयास वितरीत करणेत आलेला आहे. या पकल्प अमलबजावणी करारपत्र दिनाक- १ डिसेंबर २०१० रोजी पुर्ण केले असून, सध्या पकल्प कार्यान्वीन केलेला आहे या पकल्पतर्गत कागल, करवीर व शिरोळ, गडहिंग्लज, हातकणंगले व पन्हाळा तालुक्यातील प्रशिक्षणार्थीना प्रशिक्षण देणची कार्यावाही सुरु आहे.

## विशेष कौशल्यवृध्दी प्रशिक्षण अहवाल जानेवारी २०१२ अखेर

| अ. क्र | ट्रेड | एकूण उदिष्ट | प्रशिक्षण पूर्ण झालेले | | | | प्रशिक्षण पूर्ण असलेले | | | | नोकरीत समाविष्ट केलेले | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मागास | अल्प. | इतर | एकूण | मागास | अल्प | इतर | एकूण | मागास | अल्प. | इतर | एकूण |
| १. | गारमेंट ऑपरेटर | २५०० | ७२ | १३ | ७५ | १६० | ९ | १ | १९ | २९ | ५६ | ११ | ५९ | १२६ |
| २. | लुम ऑपरेटर | ८०० | १९ | २ | ३१ | ५२ | - | - | - | - | ११ | २ | १९ | ३२ |
| ३. | कॉम्प्युटर ऑपरेटर | ७०० | ६ | १ | २१ | २८ | १५ | १ | ३० | ४६ | - | - | १ | १ |
| ४. | गारमेंट हेल्पर | ६०० | २ | १ | ५ | ८ | २ | ० | ३ | ५ | २ | १ | ५ | ८ |
| ५. | इतर | ४०० | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| | एकूण | **५०००** | **९९** | **१७** | **१३२** | **२४८** | **२६** | **२** | **५२** | **८०** | **६९** | **१४** | **८४** | **१६७** |